# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

१ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

Email Id- recruitmentnagpurmunicipalcorp@gmail.com Website- https://nmcnagpur.gov.in


आस्थापना क्र ६९३ दिनांक : ०६/०३/२०२५

**सदंर्भ :- वाचा जाहीरात क्र.८०४/पी.आर दि.२३.१२.२०२४**

## सूचनापत्र - ३

नागपूर महानगरपालिकेच्या २४५ पदांची जाहीरात दि. २३.१२.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जाहीरातीचे अनुषंगाने प्रत्येक पदांमध्ये आरक्षणाचा तपशील जाहीरात क्र.८०४/पी.आर दि.२३.१२.२०२४ मध्ये नमूद करण्यात आलेले असून त्यात काही पदांमध्ये ज्या पदांसाठी विशिष्ट प्रवर्गाचे आरक्षण नमूद असूनही त्या पदांसाठी इतर प्रवर्गातील उमेदवारांनी अनावधानाने अर्ज सादर केलेला आहे. याबाबत त्या उमेदवारांकरीता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१) कनिष्ठ अभियंता (विद्युत) व वृक्ष अधिकारी या पदांसाठी नमूद असलेल्या आरक्षणाव्यतिरीक्त इतर प्रवर्गातील उमेदवारांनी अर्ज सादर केलेला आहे. परंतु या संवर्गातील पदांमध्ये अराखीव प्रवर्गाचे पद नसल्याने संबंधीत उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येत आहे.

२) जाहीरातीमध्ये नर्स परिचारीका (जीएनएम) मध्ये अनुसूचित जाती तसेच इ.मा.व प्रवर्गाचे पद उपलब्ध नाही. तरीही काही उमेदवारांनी अनुसूचित जाती तसेच इ.मा.व संवर्गात अर्ज भरल्याचे दिसून येते. परंतु या संवर्गात अराखीव प्रवर्गातील पदे असल्याने सदर उमेदवारांना अराखीव पदांसाठीचे निकष लावून म्हणजे अर्ज भरावयाच्या शेवटच्या दिनांकास असलेले वय गृहीत धरुन अराखीव पदांसाठी अर्ज स्वीकृत करण्यात येईल. मात्र यामध्ये ज्या उमेदवारांची वय अराखीव पदांसाठीचे निकषात बसत नसल्यास त्यांना अपात्र ठरविण्यात येत आहे. तसेच भविष्यात कुठल्याही कारणास्तव कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जवार कार्यवाही करण्यात येणार नाही. तरीही उमेदवारांकडूलन याबाबत निवेदने प्राप्त झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येईल. याची गांर्भीयाने संबंधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच Static Mock Link (Group Level Timer) उमेदवारांचे परीक्षेच्या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर www.nmcnagpur.gov.in येथे प्रसिध्द करण्यात येत आहे.

अति.आयुक्त (सामान्य)
महानगरपालिका, नागपूर